# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**


**जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/ 51 /2024-25** **दि. 08 / 04 /2024**

**प्रति,**

**जनसंपर्क अधिकारी,**

**जनसंपर्क विभाग**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय** :- प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत...

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगपालिकेच्या वेबसाईटरवर प्रसिद्ध करावी.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**Note # 1**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

## // प्रेस नोट //

**मा. सादर,**

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत प्रती वर्षी पाणीपट्टी वसुलीकरीता विषेश मोहिम राबविण्यात येते. सन 2023-24 वर्षात देखिल मा.आयुक्त महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली सदर मोहिमेअंतर्गत विभागातील, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, मेस्त्री, लिपिक व मिटर रिडर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर पथक थकबाकीदारकांची यादी तयार करुन प्रत्यक्ष थकबाकीधारकांना भेटी देणे, थकीत रक्कमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करतात. तसेच जानेवारी महिन्यापासून थकबाकीधारकांना पाणीपट्टी वसुल करणेकरीता प्रथम नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत व त्यानंतर त्याचा पाठपुरावा करुन पाणीपट्टी वसुली केली जाते.

नागरीकांमध्ये पाणीपट्टी भरणा जलद होणेसाठी जनजागृती करणेकरीता ऑटोरिक्षा यांचेवर ध्वनिक्षेपकाव्दारे जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच प्रत्यक्ष पाणीपट्टी थकबाकीधारकांच्या घरोघरी भेट देऊन थकीत पाणीपट्टी रक्केमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करण्यात येते. महानगरपालिकेमार्फत नागरीकांना पाणीपट्टी भरणे सोयीचे होणेकरीता महानगरपालिकापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच मोबाईलव्दारे देखिल MY MBMC या मोबाईल □पव्दारे पाणीपट्टी भरण्याची सुविधा दिलेली आहे. तसेच सर्व सार्वजनिक सु्ट्टी, शनिवार तसेच रविवार या दिवशी सर्व पाणीपट्टी भरणा केंद्र सकाळी 10.00 ते सायंकाळी 4.00 पर्यंत सुरु ठेवली आहेत. त्यामुळे नागरीकांना पाणीपट्टी भरणे सोईचे झाले आहे. तसेच पाणीपट्टी भरणा करणेकरीता ऑनलाईन पद्धतीवर विशेष भर देत रु. 3 कोटी 34 लाख 73 हजार 118 तर रोख व धनादेशाद्वारे 80 कोटी 31 लाख 46 हजार 046 इतकी असे एकूण 83 कोटी 66 लाख 19 हजार 164 मिरा भाईंदर महानगरपालिका कोषाग्रहामध्ये इतका जमा करण्यात आलेला आहे.

पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने यावर्षी देखिल 90% पेक्षा जास्त पाणीपट्टी वसुली केलेली आहे. सन 2023-24 या आर्थिक वर्षात रु.83.66 कोटी म्हणजेच 92.34% पाणीपट्टी वसुली केलेली आहे.



Generated from eOffice by Sharad Gorakhanath Nanegaonkar, EE(SN)WS, EXECUTIVE ENGINEER, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 08/04/2024 1